Dhanvarsha

June 19, 2020

The General Manager
Department of Corporate Services
BSE Limited
Phiroze Jeejeeboy Towers, Dalal Street,
Mumbai — 400001.

**Scrip Code: 540268**

Dear Sir / Madam,

**Subject: Newspaper publication of Audited Financial Results of the Company for the quarter and year ended March 31, 2020.**

Please find enclosed, the newspaper publication of audited financial results of the Company for the quarter and year ended March 31, 2020 published in the following Newspapers:

1. Financial Express (English) – all editions on June 18, 2020; and
2. Mumbai Lakshadeep (Marathi) – Mumbai edition on June 18, 2020.

We request you to take the above on record.

Thanking you.

Yours faithfully,
For **Dhanvarsha Finvest Limited**

DHANVARSHA FINVEST LTD.

**M Vijay Mohan Reddy**
**AVP – Legal & Company Secretary**
**Mem. No ACS 49289**

*Encl: As above*

# ...म्हणून कोल्हापुरात महापुराच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या!



कोल्हापूर: ता. १७ (प्रतिनिधी): कोल्हापूर शहरासह जिल्ह्यात सोमवारी रात्रीपासून सुरू असलेल्या संततधार पावसामुळे राजाराम आणि शिंगणापूर बंधारे पाण्याखाली गेले. जिल्हा प्रशासनाने या दोन्ही बंधाऱ्यांवरील वाहतूक अन्य मार्गाने वळवली असून, नदीकाठच्या गावांना दक्षतेचा इशारा दिला आहे. मान्सूनने सुरुवातीलाच जोरदार सलामी दिल्याने गेल्या वर्षातील महापुराच्या आठवणी जाग्या झाल्या आहेत.दबकत आलेल्या मान्सूनने अखेर कोल्हापूर जिल्ह्यात जोर पकडला. सोमवारी रात्रीपासून जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पावसाला सुरुवात झाली. दिवसभर पावसाची संततधार सुरू राहिली. धरणक्षेत्रातील अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. मंगळवारी दुपारी बाराच्या सुमारास राजाराम बंधारा येथे पंचगंगा नदीची पाणी पातळी पुलाच्या खाली सुमारे एक फूट होती. दुपारी तीनच्या सुमारास नदीचे पाणी बंधाऱ्यावरून वाहू लागले. पावसाचा जोर लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने तातडीने या मार्गावरील वाहतूक बंद करून अन्य मार्गाने वळवली. राजाराम बंधाऱ्यासह शिंगणापूर बंधाराही मंगळवारी दुपारी पाण्याखाली गेला. राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा आणि चंदगड या तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली. राधानगरी, काळम्मावाडी, चांदोली धरणांमधील पाणीसाठाही झपाटयाने वाढत आहे.मान्सूनच्या पहिल्याच पावसात पंचगंगा नदीचे पाणी पात्राबाहेर पडले आहे. येणारे तीन–चार दिवस जोरदार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. यामुळे जिल्ह्यातील नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ होण्याचा धोका निर्माण झाला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून जिल्हा प्रशासनाने नदी काठावरील गावांना दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. पावसाच्या जोरदार सलामीने कोल्हापूरकरांच्या गेल्या वर्षातील महापुराच्या आठवणी जाग्या होत आहेत. दरम्यान, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांत गेल्यावर्षी पावसाळ्यात महापुराने हाहाकार माजवला होता. अनेक दिवस हे दोन्ही जिल्हे पुराच्या वेढ्यात अडकले होते. कोल्हापूर शहरात तर अनेक इमारती पाण्याखाली गेल्या होत्या. हजारो संसार या पुरात उद्ध्वस्त झाले होते. या संकटाच्या आठवणी अजूनही डोळ्यापुढून जात नसताना गेले दोन दिवस पडणाऱ्या पावसाने सगळ्यांचीच झोप उडवली आहे.

# फोंडा शहर लॉकडाऊनचा तुर्त विचार नाही

फोंडा ता. १७ (प्रतिनिधी): राज्यात कोरोनाबाधीत रुग्णाची संख्या वाढत असल्याने फोंडा पालिकेने खबरदारीच्या उपाययोजना म्हणून काही ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेतला आहे. फोंडा शहर लॉकडाऊन करण्याचा पालिकेचा अद्याप कुठलाच निर्णय झालेला नसून त्यासंबंधी केवळ अफवा उठत आहेत. सध्याच्या स्थितीत गाफील न राहता खबरदारी म्हणून प्रत्येक नगरसेवकाला आपआपल्या प्रभागात अधिक दक्षता घ्यावी लागेल. पालिका मंडळाच्या सोमवारी झालेल्या विशेष बैठकीत काही ठोस उपाययोजनांवर चर्चा झाली. नगराध्यक्ष व्यंकटेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला फोंडयाचे आमदार रवी नाईक, मुख्याधिकारी केदार नाईक व इतर नगरसेवक उपस्थित होते. एखाद्या रहिवासी संकुलात किंवा लोकवस्तीमध्ये संशयास्पद रुग्ण आढळून आल्यास नागरिकांनी तातडीने संबंधीत नगरसेवक किंवा पालिकेशी संपर्क साधावा. पालिकेने त्यासाठी आपली यंत्रणा सज्ज ठेवली आहे. होम कोरंटाईन केलेली एखादी व्यक्ती बाहेर फिरत असल्याचे आढळून आल्यास त्याची थेट कारंटाईन सेंटरमध्ये रवानगी करण्यावाचून अन्य पर्याय राहणार नाही. सार्वजनिक ठिकाणी वावरताना नागरिकांनी फेसमास्कचा वापर सक्तीने करावा. सामाजिक अंतर कटाक्षाने पाळावे. दुकानदार, हॉटेलमालक व इतर आस्थापन चालकांनी विविध भागातून येणाऱ्या आपल्या कामगारांच्या आरोग्याकडे लक्ष ठेवावे, असे आवाहन फोंडा पालिकेतर्फे करण्यात आले आहे. कोरोनावर सध्यातरी औषध नसल्याने प्रतिकारशक्ती वाढवणारी औषधेच त्यावर उपाय आहे. त्यामुळे आरोग्य खात्यामार्फत मोफत पुरविली जाणारी ही औषधे प्रत्येक नगरसेवकामार्फत सर्व प्रभागातील रहिवासी तसेच दुकानदारांना वितरीत करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. सध्या मार्केटमधील अंतर्गत रस्त्यावर अस्ताव्यस्त भरणारा मासळी बाजार, भाजी मार्केटच्या पाठीमागे असलेल्या अप्रोच रोडवर सामाजिक अंतर राखून भरवण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. वारखंडे, खडपाबांध व इतर प्रभागामध्ये लोकांना सोयिस्कर ठरणाऱ्या मासळी विक्रेत्यांना तेथून हलविण्याचा विचार नाही. अप्रोच रोडवर नवीन विक्रेत्यांनाही रोजगाराची संधी दिली जाणार आहे, असे व्यंकटेश नाईक यांनी सांगितले. बसमधील गर्दीचा प्रवास टाळण्यासाठी व विविध भागात फैलावत चालेल्या कोरोनाच्या संसर्गाला आळा घालण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना ते राहत असलेल्या तालुक्याच्या ठिकाणीच कामावर नियुक्त करण्याची गरज आहे. ज्यामुळे संसर्गाचा धोका टळेल व हे कर्मचारी वेळेत कामावरही पोचतील. सद्य स्थितीत नागरिकांनी प्रत्येक गोष्टीसाठी सरकारवर अवलंबून न राहता स्वतः खबरदारी घेणे तेवढेच आवश्यक आहे. सरकारला लॉकडाऊन करण्याची आवश्यकता भासल्यास या काळात खरेदीसाठी प्रत्येक कुटुंबाला खरेदीसाठी एकच परवाना देऊन बाजारातील गर्दी टाळता येईल, अशी सूचना आमदार रवी नाईक यांनी केली.

# हौसेला मोल नाही, बनविला चांदीचा मास्क



रत्नागिरी, ता. १७ (प्रतिनिधी): कोरोनाचे संकट असल्याने काही जण संधीचे सोने करत आहेत. तर काही जण आपली हौस पुरविण्यात मश्न दिसत आहेत. हौसेला मोल नाही, असाच प्रकार रत्नागिरीत दिसून आला आहे. कोरोनाबरोबर आता जगायला शिका, असा संदेश जगातील आरोग्य संघटनेने दिला आहे. त्यामुळे आता कोरोनाविरुद्ध लढा देताना सॅनिटायझर आणि मास्क वापरणे अनिवार्य असणारआहे. मात्र, रत्नागिरीत एकाने चक्क चांदीचा मास्क बनवून घेतला आहे. ६० ग्रॅम वजनाच्या चांदीत हा मास्क बनवण्यात आला आहे.

कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता मास्क बंधनकारक करण्यात आला आहे. घराबाहेर पडल्यानंतर मास्कचा वापर केला नाही तर गुन्हा दाखल होऊ शकतो. कोरोनाशी लढण्यासाठी आता मास्कची मागणी वाढल्याचे दिसून येत आहे. आज बाजारात आणि ऑनलाईन मास्कमध्येही विविधता दिसून येत आहे. आता वेगवेगळ्या प्रकारचे मास्क मिळत आहेत. स्त्रियांसाठी आता प्रत्येक ड्रेसला मॅचिंग असलेले मास्कही मिळू लागले आहेत.

कोरोनाबरोबर जगायचे असले तरी आता लग्नकार्यात देखील मास्क वापरणे गरजेचे बनणार आहे. कार्यालयात जाण्यासाठीही मास्क बंधनकारक आहे. महिलांची दागिने आणि कपड्यांची हौस कायमच राहणार आहे. त्यात आता नव्याने मास्कची भर पडली आहे. तर काहीही कोरोनाची संधी बघून वेगवेगळे मास्क तयार केले आहेत. यात कोल्हापूर येतील एका सुवर्णकाराने चांदीचा मास्क बनविले. आता काही सुवर्णकारांनी देखील शक्कल लढविली आहे. रत्नागिरीतील एक सुवर्णकार ज्वेलर्सने आता चांदीचा मास्क बनवला आहे. सध्या ६० ग्रॅम वजनाच्या चांदीत हा मास्क बनवण्यात आला आहे.

रत्नागिरीतील मांडवी येथे रहाणारे शेखर यशवंत सुर्वे यांनी खास कोल्हापूर येथून हा चांदीचा मास्क तयार करुन घेतला आहे. याबाबत माहिती देताना शेखर सुर्वे यांनी सांगितले की एक आवड म्हणून हा मास्क घेतला आहे. तो ६० ग्रामचा असून त्याची किंमत ३९०० रुपये आहे. मी एक फोटो मोबाईलवर पाहिला होता. तसा मास्क मला हवा आहे म्हणून माझ्या ज्वेलर्सला दाखविले. त्यांनी तो कोल्हापूरहून मागवून घेतला १५ दिवसा पूर्वी कोल्हापूरवरुन पाठवून देण्यात आला, असे त्यांनी स्पष्ट केले.

# कोकण रेल्वे कर्मचाऱ्याचा कोरोनाने मृत्यू, संपर्कातील ५२ जणांना केले क्वारंटाईन

रत्नागिरी, ता. १७ (प्रतिनिधी): कोकण रेल्वेच्या एका कर्मचाऱ्याचा कोरोनामुळे मृत्यू झाल्यानंतर जळपास ५२ कर्मचाऱ्यांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. कोकण रेल्वेच्या बेलापूर येथील मुख्यालयातील सिग्नल आणि संपर्क विभागातील कर्मचाऱ्याचा दोन दिवसांपूवी कोरोनामुळे मृत्यू झाला. या कर्मचाऱ्याच्या संपर्कात आलेल्या ५२ कर्मचाऱ्यांना क्वारंटाईन करण्यात आले आहेत. रत्नागिरी येथील सुमारे ३० कर्मचाऱ्यांचे स्वॅब घेण्यात आले आहेत.

५० वषी कर्मचारी ९ जून रोजी रोहा तसेच कोलाड येथे येऊन गेला होता. त्यावेळी रत्नागिरी येथूनही कर्मचारीही गेले होते. काही कर्मचाऱ्यांनी एकत्र जेवण घेतले होते. दरम्यान, निधन झालेल्या कर्मचाऱ्याला काही दिवस ताप आला होता. मात्र, ही बाब त्याने कोणाला सांगितलेली नाही, असे त्याच्या संपर्कात आलेल्यांपैकी काहींनी सांगितली. त्यामुळे कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या सर्वांना क्वारंटाईन करण्यात आले आहे. त्यांचीही कोरोना चाचणी घेतली जाणार आहे.

दरम्यान, ५० वर्षी कर्मचारी हा मुंबईत परतल्यानंतर १३ जून रोजी त्याचा कोरोनामुळे मृत्यू झाला. त्यानंतर कोकण रेल्वेने कर्मचाऱ्याच्या संपर्कातील सर्वांची यादी तयार करत त्यांना रत्नागिरी येथे क्वारंटाईन करुन ठेवले आहे. त्यांची संख्या ५० ते ५२च्या घरात आहे. दरम्यान, रत्नागिरी जिल्ह्यात रविवारी सायंकाळपासून आणखी १३ रुग्णांचे अहवाल पॉझिटिव्ह आल्यामुळे एकूण पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या ४३१ झाली आहे. पॉझिटिव्ह आलेल्या रुग्णांमध्ये रुग्ण कळंबणीतील असून तीन रुग्ण रत्नागिरी तालुक्यातील तर एक रुग्ण देवरुख येथील आहे. दरम्यान दहा रुग्णांना बरे झाल्यानंतर घरी सोडण्यात आले त्यामुळे बरे झालेल्यांची एकूण संख्या ३०१ इतकी झाली आहे.

# राज्यातील सर्वसामान्य लोकसंख्ये मध्ये कोरोना संसर्गाचे प्रमाण अत्यल्प, सहा जिल्ह्यांतील सिरो सर्व्हेचा निष्कर्ष

मुंबई, ता. १७ (प्रतिनिधी): भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेतर्फे (आयसीएमआर) गेल्या महिन्यात देशातील ८३ जिल्ह्यांमध्ये कोरोनाच्या अनुषंगाने समाजाधारित सिरो सर्व्हे घेण्यात आला. त्यात महाराष्ट्रातील अहमदनगर, बीड, जळगाव, परभणी, नांदेड आणि सांगली या सहा जिल्ह्यांचा समावेश होता. राज्यातील सहा जिल्ह्यांमध्ये पॉझिटिव्ह रुग्णांचे प्रमाण १.१३ एवढे आढळून आले आहे.

राज्यातील सर्वसामान्य लोकसंख्येमध्ये कोरोना संसर्गाचे प्रमाण अत्यल्प असून लॉकडाऊन धोरण यशस्वी झाल्याचे दिसून येत असल्याचा निष्कर्ष या सर्व्हेत आढळून आहे. राज्यातील बहुसंख्य लोकसंख्येमध्ये कोरोनाच्या अनुषंगाने प्रतिकारशक्ती निर्माण करणे, कोरोना प्रतिबंध व नियंत्रणासाठी शारीरिक अंतर राखणे, हातांची स्वच्छता, श्वसनसंस्थेची स्वच्छता, नेहमी स्पर्श होणाऱ्या पृष्ठभागाची स्वच्छता या उपायांवर भर देणे आवश्यक असून प्रभावी सर्वेक्षण आणि काटेकोर कंटेनमेंट धोरण यावर अधिक भर देण्यात येत असल्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी सांगितले.

राज्यातील सर्वसामान्य लोकसंख्येमध्ये कोरोनाचा कितपत प्रसार झाला आहे, हे जाणून घेण्याकरता हे सर्वेक्षण करण्यात आले होते. या जिल्ह्यामधे रॅन्डम पध्दतीने निवडलेल्या १० समुहातील प्रत्येकी ४० जणांची अशी एकूण ४०० लोकांच्या रक्ताची तपासणी राष्ट्रीय विषाणू संस्थेने विकसित केलेल्या इलायझा पद्धतीने करण्यात आली. त्याद्वारे या व्यक्तींच्या रक्तद्रवामधील प्रतिपिंडांचा शोध घेण्यात आला आहे. त्यासाठी राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्र, नवी दिल्ली, राष्ट्रीय साथरोगशास्त्र संस्था, चेन्नई आणि राष्ट्रीय क्षयरोग संशोधन केंद्र, चेन्नई या संस्थांनी तांत्रिक सहकार्य केले.

राज्यातील सहा जिल्ह्यांचा तपशील

बीड– एकूण घेतलेले नमुने: ३९६, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: ४, पॉझिटिव्ह प्रमाण: १.0१

परभणी– एकूण घेतलेले नमुने: ३९६, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: ६, पॉझिटिव्ह प्रमाण: १.५१

नांदेड– एकूण घेतलेले नमुने: ३९३, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: ५, पॉझिटिव्ह प्रमाण: १.२७

सांगली– एकूण घेतलेले नमुने: ४००, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: ५, पॉझिटिव्ह प्रमाण: १.२५

अहमदनगर– एकूण घेतलेले नमुने: ४0४, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने:५, पॉझिटिव्ह प्रमाण: १.२३

जळगाव– एकूण घेतलेले नमुने: ३९६, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: २, पॉझिटिव्ह प्रमाण: 0.५

एकूण: एकूण नमुने: २३८५, त्यापैकी पॉझिटिव्ह नमुने: २७, पॉझिटिव्ह प्रमाण: १.१३

# सोलापूर शहर, जिल्ह्यात संततधार पाऊस



सोलापूर, ता. १७ (प्रतिनिधी): सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध भागात सलग तिसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. सकाळी आठ वाजल्यापासूनच पावसाला सुरुवात झाली. कधी संततधार तर कधी जोरदार पावसाने हजेरी लावली. पावसामुळे शहरातील बाजारपेठा, भाजी मंडई रस्त्यावर पाणीच पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. सकाळपासून ते सायंकाळपर्यंत पावसामुळे शहरातील रस्ते जलमय झाले होते. दिवसभर सूर्यनारायणचे दर्शन झाले नाही. जून महिना उजाडला आणि सोलापूर जिल्ह्यात विजेच्या कडकडाटासह जोरदार पावसाची हजेरी लावली आहे. तालुक्यासह, शहरात ही पावसाने चांगली हजेरी लावली. १ जून ते १५ जूनपर्यत सरासरी ५२ मि.मि पावसाची नोंद झाली आहे. पंढरपूर, दक्षिण सोलापूर, बाशी, माळशिरस, सांगोला, मोहोळ, मंगळवेढा या तालुक्यात चांगला पाऊस झाला आहे. सकाळी आठ वाजल्यापासून हजेरी लावल्याने दरम्यान एक ते दोन तासात पावसाची रिपरिप सुरू होती. अचानक आलेल्या पावसामुळे बाजारपेठांमध्ये ग्राहकांची चांगलीच तारांबळ उडाली. दिवसभर पावसाची संततधार सुरू होती काही ठिकाणी जोरदार पाऊस पडत होता. पावसामुळे रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते.

सोलापूर जिल्ह्यात १ जून ते १५ जून पर्यत पावसाने विजेच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह सोलापूर शहर जिल्ह्यात दमदार हजेरी लावली. जिल्ह्यात आतापर्यत ५0.७५ मी.मी पावसाची नोंद झाली आहे. तर १0४.३६ टक्के पाऊस पडला आहे.

# चार वर्षांच्या बालिकेला बनवलं शिकार

कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी): खाऊचे आमिष दाखवत चार वर्षीय बालिकेवर दोन अल्पवयीन मुलांनी लैंगिक अत्याचार करून नंतर विहिरीत ढकलून तिचा खून केला. हातकणंगले तालुक्यातील चंदूर येथे दुपारी घडलेला धक्कादायक प्रकार आज उघडकीस आला असून याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. या दोघांनीही गुन्ह्याची कबुली दिली आहे. शिवाजीनगर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी चंदूर येथील शाहूनगर परिसरातील दोन अल्पवयीन मुले त्याच परिसरात राहणाऱ्या चार वर्षीय बालिकेस खाऊचे आमिष दाखवून सोबत घेऊन गेले. जवळच्याच शेतात जाऊन मुलांनी बालिकेवर अत्याचार केला. यानंतर गोरखनाथ कुंभार या शेतकऱ्याच्या विहिरीत ढकलून तिचा खून केला. दरम्यान, सायंकाळ झाली तरी मुलगी घरी न आल्याने नातेवाईकांनी तिचा शोध सुरू केला. काही वेळातच जवळच्याच विहिरीत तिचा मृतदेह आढळल्याने कुटुंबीयांना धक्का बसला. इचलकरंजीतील आयजीएम रुग्णालयात मृतदेह घेऊन गेल्यानंतर डॉक्टरांनी शवविच्छेदन न करताच अंत्यसंस्कार करण्यास सांगितले. खेळता खेळता मुलगी विहिरीत पडली असावी असे समजून अंत्यसंस्कार करण्यात आले. नातेवाईकांनी सोमवारी सकाळी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू केली. यंत्रमाग कारखान्यांचे सीसीटीव्ही फुटेज पाहिले असता, दोन अल्पवयीन मुले बालिकेला शेताकडे घेऊन जाताना दिसले. संबंधित मुलांकडे चौकशी केल्यानंतर सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांच्या ताब्यात दिल्यानंतर मुलांनी गुन्ह्याची कबुली दिली. शिवाजीनगर पोलिसांनी दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले असून, अधिक तपास सुरू आहे. मुलीला दफन केलेला मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदन केले जाणार आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक ईश्वर ओमासे यांनी दिली. अल्पवयीन मुलांकडून बालिकेवर लैंगिक अत्याचार आणि तिचा खून करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने कोल्हापूर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. अल्पवयीन मुलांनी केलेले कृत्य पाहून पोलिस अधिकारीही चक्रावले आहेत. या गुन्ह्याबाबत संशयित मुलांकडून अधिक माहिती घेतली जात आहे.




Dhanvarsha

## DHANVARSHA FINVEST LIMITED

**Corporate Identity Number:** L24231MH1994PLC0334457
**Registered Office:** 2nd Floor, Building No.4, DJ House, Old Nagardas Road, Andheri (East), Mumbai – 400069, Maharashtra.
**Phone:** +91-22-68457200 | **Email:** contact@dfltd.in | **Website:** www.dfltd.in

**EXTRACT OF STANDALONE AND CONSOLIDATED AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND YEAR ENDED MARCH 31, 2020**

(₹ in Lakhs, except per share data)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 31-Mar-20 Audited | Quarter ended 31-Mar-19 Audited | Year ended 31-Mar-20 Audited | Year ended 31-Mar-19 Audited | Year ended 31-Mar-20 Audited | Year ended 31-Mar-19 Audited |
| 1 | Total income from operations (net) | 585.10 | 498.05 | 1,929.52 | 1,929.32 | 1,929.38 | 1,929.32 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 51.97 | 242.50 | 558.06 | 242.71 | 554.30 | 242.71 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 51.97 | 242.50 | 558.06 | 242.71 | 554.30 | 242.71 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 34.53 | 190.35 | 409.89 | 213.43 | 406.09 | 213.43 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | (1.20) | 2.51 | (1.20) | 2.51 | (1.20) | 2.51 |
| 6 | Paid up equity share capital (Face Value of ₹ 10/- per share) | 1,350.78 | 1,350.00 | 1,350.78 | 1,350.00 | 1,350.78 | 1,350.00 |
| 7 | Reserves (excluding revaluation reserve) as per balance sheet | - | - | - | - | - | - |
| 8 | Earnings Per Share (EPS) (FV of ₹ 10/- per share) (Not annualized for the interim periods) Basic EPS (Amount in ₹) | 0.26 | 1.58 | 3.04 | 1.77 | 3.01 | 1.77 |
| | Diluted EPS (Amount in ₹) | 0.24 | 1.52 | 2.86 | 1.71 | 2.83 | 1.71 |

**Note:**

1. The above is an extract of the detailed format of Standalone and Consolidated Audited Financial Results for the quarter and year ended March 31, 2020, filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the audited financial results are available on the BSE website at (www.bseindia.com) and on the Company's website at (www.dfltd.in); and
2. The financials results of the Company has been prepared in accordance with Indian Accounting Standards ('Ind AS') notified under Section 133 of the Companies Act 2013 ('the Act') read with the Companies (Indian Accounting Standards) Rules, 2015 and other accounting principles generally accepted in India.

**For and on behalf of the Board of Dhanvarsha Finvest Limited**

Sd/- **Rohanjeet Singh Juneja**, Joint Managing Director, DIN: 08342094

Sd/- **Karan Neale Desai**, Joint Managing Director, DIN: 05285546

**Place :** Mumbai
**Date :** June 15, 2020